**कौ.हिं.महिलांचे संरक्षण अर्ज क्र. ७१/२०२३**
**श्रुती वि. अनिरुध्द**

## <u>अर्जदार हजर अर्जदाराचा उलटतपास शपथेवर जाबदेणार तर्फे विधिज्ञ एस. डी. अरुडे यांचेमार्फत</u>

मला मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषा येतात. सध्या माझे वय ३४ वर्षे आहे. मी सध्या एफ ४, आयेशा रेसिडेन्सी, धानोरी, पुणे येथे राहते.

प्रश्न– माझे असे म्हणणे आहे की, तुम्ही तुमच्या बहिणीकडे राहता ?

उत्तर– बहिण व भाउ दोघांकडे राहते.

हे म्हणणे खरे नाही की, मी, माझे बहिण व भावासोबत माझी आईसुध्दा राहते. वरील नमुद पत्त्यावर मी सप्टेंबर २०२३ पासून राहते. सप्टेंबर २०२३ मध्ये मी माझ्या बहिणीकडे बावधन येथे राहत होते. माझ्या बहिणीचे नाव योगिता सचीन सांबे असे आहे. मी दिनांक ०२ मार्च २०२३ पासून माझी बहिण योगिता सचीन सांबे यांचे घरी राहत होते. त्याच्या आधी मी अनिरुध्द सोबत अमेरिकेत राहत होते. मी तिथे अनिरुध्दसोबत दिनांक १२ जुन २०२१ ते १७ फेब्रुवारी २०२३ पर्यंत राहीले. माझे लग्न अनिरुध्दसोबत दिनांक ०२ एप्रिल २०१९ रोजी झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा विवाह आर्य समाज मंदिरात झाला. मी अभिलेखावर लग्नाची पत्रीका दाखल केली नाही. माझे लग्न अनिरुध्दसोबत तारामाता देवस्थान, मोरशी, जि. अमरावती येथे झाले होते. हे मला माहित नाही की, आर्य समाज मंदिरात आर्य समाज पध्दतीने लग्न करायचे असेल तर वयाचा व राहण्याच्या ठिकाणाचे पुरावे दयावे लागतात. मी मंदिरात असा कोणताही पुरावा दिला नव्हता. हे मला माहित नाही की, आर्य समाज पध्दतीने लग्न करायचे असेल तर शपथपत्र दयावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, लग्नाच्या वेळी मंदिरात जवळपास फक्त ५० लोक होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०३/०४/२०१९ रोजी आम्ही आमचे विवाहाचे नोंदणीकृत केले होते. त्यानंतर मी नांदण्यासाठी बडनेरा, जि. अमरावती येथे गेले होते. मी तिथे एक आठवडा राहिले.

त्यानंतर मी मुंबईला गेले. तिथे माझी नोकरी होती. मुंबई येथे मी दोन

महिने राहिले. त्यानंतर मी अमेरिकेत गेले. हे म्हणणे खरे आहे की, व्हीसा बनविण्यासाठी मदत जाबदेणार यांनी केली होती. मुंबई येथे मी भाडयाने राहत होते. तिथे मी सहा हजार रुपये भाडे देत होते. तेव्हा माझा पगार सत्तावीस हजार रुपये होता. मी माझे नोकरीचे ठिकाणी लोकल ट्रेनने जात होते. माझ्याकडे वैयक्तीक कोणतीही काम करणारी बाई नव्हती.

हे म्हणणे खरे आहे की, माझे शिक्षण तालुक्यात झाले. हे म्हणणे खरे आहे की, मोरशी तालुका विकसित झालेला नाही. माझ्या आई वडीलांच्या घरी सुध्दा कोणतीही घरकाम करणारी बाई नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हा घरचे सगळे काम आम्ही घरातील सर्वजण मिळुन करत होतो. मोरशी येथे माझ्या आजोबांच्या नावावर शेती आहे. किती शेती आहे हे मला माहित नाही. शेतीमध्ये गहु, कापुस, सोयाबीन व तुरीचे पीक घेत असतो. त्या शेतीमधुन माझे घरी देखील काही वाटा मिळतो. साक्षीदार स्वतः सांगते की, जोपर्यंत माझे वडील होते तोपर्यंत वाटा मिळत होता. मी माझे असेट अॅण्ड लायबिलीटीमध्ये शेतीचा उल्लेख केला नाही.

मी जेव्हा जुन २०१९ मध्ये अमेरिकेला गेले होते तेव्हा माझे व जाबदेणार याचेमध्ये वादाचा कोणताही विषय नव्हता. आमच्यामध्ये चांगले संबंध होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मला भारतात यायचे होते त्यावेळी जाबदेणार याने मला तिकीट काढुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, तिकीटाचा खर्च जाबदेणार देत होता. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, माझ्या वडीलांच्या वर्षश्राध्दाच्यावेळी मी जाबदेणार याला मला जायचे आहे असे म्हटल्यावर त्याने नाही म्हटले होते. त्यानंतर मी माझ्या सासु सास–यांना मला जायचे आहे असे विचारले होते तेव्हा माझे सासरे म्हटले होते की, हे बडनेर, अमरावती नाही की, पाच सहा रुपये लागतात. इथुन जायला लाखोने खर्च येतो ते कोण देणार तुझ्या घरचे देणार का. मी आधी अनिरुध्दला जाण्यासाठी विचारले होते. मी वर्षश्राध्दाला जाण्याकरीता कोणत्या तारखेला अनिरुध्दला विचारले होते हे मला आठवत नाही. तेव्हा वर्षश्राध्द दिनांक

०५ एप्रिल २०२२ रोजी होते. सदर तारीख मला माझ्या आईकडुन कळली होती. माझ्या आईने मला फोनवरुन सांगितले होते. ती तारीख मला आठवत नाही.

प्रश्न– तुमच्या आईने तुम्हाला फोनवर सांगितल्यावर किती दिवसानंतर तुम्ही अनिरुध्दला विचारले होते ?

उत्तर– लगेच विचारले असेल.

हे म्हणणे खरे आहे की, मी अनिरुध्दला किती तारखेला विचारले होते व अनिरुध्दने किती तारखेला मला नाही म्हटले होते हे मला माहित नाही. अनिरुध्दला विचारल्यावर त्याने नाही म्हटले होते म्हणुन मी माझ्या सासु सास–यांना विचारले होते. त्याच्या आधी मार्च २०२१ मध्ये व्हीसासाठी भारतात येवुन गेले होते. त्याच्या आधी मी कधीच भारतात आले नाही.

माझे वडील मी माहेरी गेल्यानंतर कोविडने आजारी झाले होते. मी माहेरी दिनांक ०८ एप्रिल २०२१ रोजी गेले होते. मी भारतात ६ मार्च २०२१ रोजी आले होते. दिनांक २३ व २४ मार्च २०२१ रोजी माझे मुंबई येथे व्हीसासाठी इंटरव्हु होता. त्यानंतर मी दिनांक ३० मार्च २०२१ रोजी माझे सासरी बडनेरा येथे गेले व दिनांक ०८ एप्रिल २०२१ रोजी माझे माहेरी गेले होते. मी सासरी एक आठवडा राहिले होते. तेव्हा माझा, माझ्या सासु सास–यांसोबत कोणताही वाद नव्हता.

प्रश्न– माझे असे म्हणणे आहे की, तुमच्या मागणीप्रमाणे तुमच्या पतीने तुम्ही जेव्हा अमेरिकेत गेल्या होत्या तेव्हा तुम्हाला कपडे, पर्स, शुज, मोबाईल व दागिने दिले होते ?

उत्तर– मी मागणी केली नव्हती.

प्रश्न– माझे असे म्हणणे आहे की, तुमच्या पतीने तुम्ही जेव्हा अमेरिकेत गेल्या होत्या तेव्हा तुम्हाला कपडे, पर्स, शुज, मोबाईल व दागिने भेटवस्तु म्हणुन दिल्या होत्या ?

उत्तर– फक्त मोबाईल पाडव्याला भेट म्हणुन दिला होता.

हे म्हणणे खरे नाही की, माझे पती मला फिरायला नेत होते. हे म्हणणे

**कौ.हिं.महिलांचे संरक्षण अर्ज क्र. ७१/२०२३**
**श्रुती वि. अनिरुध्द**

खरे आहे की, माझ्या पतीने माझे वडीलांना दिड लाख रुपयांची मदत केली होती.

प्रश्न– माझे असे म्हणणे आहे की, तुमच्या वडीलांच्या मृत्युनंतर पॉलीसीचे हफते तुमचे पतीने भरले होते ?

उत्तर– एकदाच भरले होते.

हे म्हणणे खरे नाही की, घर बांधण्याकरीता माझ्या वडीलांना निधी कमी पडत होता तेव्हा माझ्या पतीने त्यांना तो निधी दिला होता. मी सांगितले म्हणुन माझ्या पतीने माझ्या अकाउंट अमेरिकेत उघडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती माझ्या खात्यात दरमहा शंभर डॉलर जमा करत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या काळात माझी बहिण व भाउ यांना नोकरी मिळण्यासाठी माझ्या पतीने प्रयत्न केले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाच्या मोबाईलमध्ये रिचार्ज करण्यासाठी मी माझ्या पतीला पैसे मागत होते. हे म्हणणे खरे आहे की, मार्च २०२२ मध्ये करोना काळात हवाई प्रवास बंद होता तेव्हा माझ्या पतीने महाग तिकीट काढुन मला भारतात पाठविले होते. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हा मी माझ्या वडीलांच्या वर्षश्राध्दासाठी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, नागपुर विमानतळावरुन मोरशी येथे जाण्यासाठी माझे पतीने कॅब करुन दिली नाही म्हणुन मी त्यांना शिवीगाळ केली होती. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा मी चिडुन माझ्या पतीला 'तु हरामखोर आहे, तुला माझी चिंता नाही' असे म्हटले होते. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हा मी माझे माहेरी गेले होते.

**<u>न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | समक्ष |
| MAIMUNA SULTANA MOINUDDIN Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN | MAIMUNA SULTANA MOINUDDIN Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN |
| (मैमुना सुल्ताना एम.) | (मैमुना सुल्ताना एम.) |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी |
| दि. ०१/११/२०२५ | दि. ०१/११/२०२५ |